# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक :- १५/०३/२०१८

**मालेगाव शहरात जबरी लुटमार करणारे सराईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केले गजाआड**

---

मालेगाव शहरातील वाढते जबरी लुटमारीचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो** यांनी पोलीस ठाणे, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास सतर्क गस्त घालणेबाबत सुचना देवुन गुन्हे उघडकिस आणणेसाठी मार्गदर्शन केले होते. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना नाउघड गुन्हयांचा कसोशिने तपास करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक १४ मार्च २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे मालेगाव पथकातील अधिकारी व कर्मचारी हे मालेगाव शहरात गस्त घालत होते. दरम्यान **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना खब-यांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार बिस्मिल्ला नगर परिसरात काही इसम चोरीचे मोबाईल व मोटर सायकल वापरत असल्याचे समजले वरून स्थागुशाचे मालेगाव पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी बिस्मिल्ला नगर परिसरातील हॉटेल गरीब नवाज जवळुन **इसम नामे १) सईद अहमद फैय्याज अहमद, वय २३, रा. जाफरनगर, मालेगाव,** जि.नाशिक यास रात्रीचे सुमारास सापळा लावुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाचे कब्जातुन एक हिरो होण्डा शाईन मोटर सायकल हस्तगत करण्यात आली असुन तिची नंबर प्लेट बनावट आहे. सदर मोटर सायकल आरोपी सईद अहमद याने त्याचा साथीदार नामे **२) ताहिर जमाल शाहिद जमाल उर्फ ताहिर डॉन,** रा. काली खोली, मालेगाव याचेसह हजारखोली परिसरातील युसूफिया मशिद येथुन चोरी केल्याची कबुली दिली असुन **आयशानगर पोलीस ठाणे । गुरनं १४/२०१८** भादवि कलम ३७९ हा **मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघडकीस** आलेला आहे.

ताब्यात घेतलेला आरोपी नामे सईद अहमद यास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने त्याचा साथीदार ताहिर जमाल उर्फ ताहिर डॉन व त्यांचा एक मित्र अशांनी काही दिवसांपुर्वी **मालेगाव** शहरातील ६० फुटी रोड सटाणा नाका, तसेच नुरबाग परिसरातील दादा दादी गार्डन समोर मोटर सायकलवर भरधाव वेगाने येवुन **पायी चालणारे इसमांचे मोबाईल जबरीचे हिसकावुन नेल्याची कबुली** दिली आहे. सदर आरोपीने कबुली दिलेवरून **मालेगाव छावणी पो.स्टे. । गुरनं ३०/२०१८** भादवि कलम ३९२,३४, तसेच **आयशानगर पो.स्टे. । गुरनं १३/२०१८** भादवि कलम ३९२ असे जबरीचोरीचे दोन गुन्हे उघडकीस आलेले आहे. सदर आरोपीचे कब्जातुन वरील गुन्हयातील चोरीस गेलेले **ओप्पो, एल.वाय.एफ. व सोनी कंपनीचे ०३ मोबाईल** हॅण्डसेट, गुन्हयात वापरलेली **होण्डा शाईन व हिरो एच.एफ.डिलक्स** मोटर सायकल असा **एकुण ९८,०००/- रू. किं.चा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे. ताब्यात घेतलेला आरोपी सईद अहमद याचे इतर दोन साथीदारांचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन सदर आरोपीतांकडुन अजुन काही जबरी चोरी, मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सपोनि संदिप दुनगहू,** सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, पोना

राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ अशा पथकाने सदर कामगिरी केली असुन मोटर सायकल चोरी ०१, व जबरी चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणलेले आहे.